## <u>ई-निविदा सूचना</u>

## <u>अमरावती जिल्हयातील रेती घाटांचा लिलाव (दुसरा टप्पा)</u>

## ई-निविदा/ ई-लिलाव-सन २०१६-२०१७

जाहीर सुचना देण्यांत येते की, **<u>अमरावती जिल्हयातील दुसऱ्या टप्प्यातील १३ तालुक्यातील ९४ रेतीघाटाचे ई-टेंडरींग ई-ऑक्शन, जिल्हास्तरीय पर्यावरण आघात निर्धारण समिती (अमरावती) च्या मंजूरीने करण्यांत येत आहे.</u>**

सन २०१६-२०१७ करिता दि. ३०/०९/२०१७ पर्यंतच्या मुदतीसाठी ई-निविदा निर्गती करणेसाठी https://eauctioncollamr.abcprocure.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहेत. तसेच ई-लिलावाकरीता https://www.eauctioncollamr.abcprocure.com या वेबसाईटचा उपयोग करावा. सदर वेबसाईटची लींक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावतीच्या amravati.nic.in या वेबसाईटवर देण्यात आलेली आहे. इच्छूक कंत्राटदारांना ई-निविदा व ई-लिलावात भाग घेणेसाठी विनंती करण्यात येत आहे.

रेती घाटाचे ई-टेंडरींग करते वेळी सर्व प्रथम जिल्हा, व्दितीय उपविभाग व तद्नंतर तालुकावार आलेल्या अपसेट किंमती पेक्षा जास्त रक्कम प्राप्त झाल्यास त्या किंमतीस अनुकमे प्रथम/व्दितीय/तृतीय प्राधान्य देण्यांत येईल. अशा प्रकारची बोली प्राप्त न झाल्यास वाळुघाट निहाय प्राप्त ई-टेंडर व ई-लिलावाला नियमाुसार मंजुरी प्रदान करण्यांत येईल. ई-टेंडरिंग उघडल्यांतर उच्चतम प्राप्त रक्कमे वरुन त्या रेतीघाटाचा ई-लिलाव सुध्दा घेण्यात येईल. त्या लिलावात उच्चतम बोली बोलणा-याचे नावे तो रेती घाट मंजूर करण्यात येईल. मात्र सदरच्या जाहीर लिलावास फक्त त्या त्या रेती गटाचा ई-टेंडर भरणा-यांनाच भाग घेता येईल, इतरांना भाग घेता येणार नाही. ई-लिलावात बोली न आल्यास ई-टेंडरच्या उच्चतम देकार स्वीकारण्यात येईल.

ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेण्याकरीता इच्छुक कंत्राटदाराना उपरोक्त वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणी करीता डिजिटल सिग्नेचर सर्टीफीकेट अनिवार्य आहे. निविदेचा नमूना, प्रतिज्ञापत्र, रेती घाट यादी, अटी व शर्ती, रु. ६५५३/- (१० लाखा पेक्षा कमी किमतीच्या रेती घाटा करीता रु. ३५५३/-) (ना-परतावा) टेंडर फी अधिक प्रोसेसिंग फि ऑन-लाइन जमा केल्यानंतर निविदाधारकाला संकेतस्थळावरुन ऑनलाईन ई-निविदा खरेदी करता येईल. रेती घाटा संबंधी ची विस्तृत माहिती उपरोक्त वेबसाईटवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसिल कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

## पहिल्या फेरी अखेर शिल्लक राहिलेल्या रेतीघाटाबाबत
## (दुसरा टप्पा- दुसरी फेरी)

| दिनांक | तपशील |
|---|---|
| १०.११.२०१६ | सकाळी १०.०० वाजे पासून बिडर रजिस्टेशन ऑन-लाईन (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| १६.११.२०१६ | सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदाधारकाचे ऑनलाईन रजिस्टेशन करणे (संगणकीय नोंदणी) बंद होईल. |
| ११.११.२०१६ | सकाळी १०.०० पासून निविदाधारकास ऑनलाईन ई-निविदा भरणे (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| १७.११.२०१६ | सायंकाळी ५.०० वाजता ई-निविदा ऑनलाईन पध्दीने (संगणकीय) स्वीकारणे बंद होईल. |
| १८.११.२०१६ | सकाळी १० वाजता पासुन गट केलेल्या व त्यामधील प्रत्येक रेती स्थळांचे ई-निविदा जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथील सभागृहात डाऊनलोड करुन उघडण्यात येईल. |
| १९.११.२०१६ | ई-ऑक्शन (ई-लिलाव) खालील प्रमाणे करण्यात येईल.<br>गट (लॉट) क्रमांक- (जिल्हा स्तर) - सकाळी ९.०० ते १०.०० वाजेपर्यंत.<br>गट (लॉट) क्रमांक- (उपविभाग स्तर)- सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत.<br>गट (लॉट) क्रमांक- (तालुका स्तर) - दुपारी १.०० ते २.०० वाजेपर्यंत.<br>गट (लॉट) क्रमांक- (पृथक पृथक (individual sand ghats) दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत.<br>(वेळ समाप्तीचे वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणाली व्दारे प्रत्येकी १० मीनीट प्रमाणे फक्त ३ (तिन) वेळा वाढ करण्यात येईल). लिलावाची बोली (Increment amount) कमीतकमी अपसेट प्राईजच्या १ टक्के (पूर्णांकात) वाढीव दराने असून अमर्यादित असेल. त्यानंतर ई-लिलाव बोली उघडण्ययात येईल. |